# प्रेस नोट दि. २२/०८/२०१९
## फसवणुक व बनावट दस्तऐवजाच्या गुन्हया मधील पती-पत्नी यांचेपैकी पत्नीस अटक
## वानवडी पोलीस स्टेशन

वानवडी पोलीस स्टेशन मधील फसवणुकी व बनावट दस्तऐवजाच्या गुन्हयामध्ये नितीन दत्तात्रय टिळेकर व त्याची पत्नी,रा.दोघे हडपसर,पुणे हे उच्चभ्रु वस्तीत दाखल गुन्हया मध्ये गेले वर्षापासुन पोलीसांना गुंगारा देवुन अस्तित्व लपवुन वावरत होते. दाखल गुन्हयातील आरोपी महिला ही मगरपट्टा,हडपसर,पुणे येथे राहत असल्याचे खात्रीशीर बातमी  पोलीस उप-निरीक्षक,अंकुश डोंबाळे यांना मिळाल्याने सदर महिलेचा पती व तीला अटक करणेसाठी पोलीस उप-निरीक्षक,डोंबाळे यांनी वरिष्ठांना खबर देवुन पोलीस स्टेशनकडील महिला पोलीस उप-निरीक्षक,जोत्सना पाटील, सहा. पोलीस फौजदार गुरव, पो.ना.गिरमकर, म.पो.शि.खांदवे, पो.शि.लवटे,पो.शि.
जगदाळे यांनी बातमीच्या ठिकाणी जावुन खात्री केली असता,गुन्हयातील महिला हि मिळुन आलेने तीला अटक करण्यात आली असुन,तीचा पती नितीन टिळेकर हा मिळुन आला नाही. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप-निरीक्षक,अंकुश डोंबाळे हे करीत आहेत.